MHRG070016622022

| | |
|---|---|
| केस दाखल दिनांक | २९/११/२०२२ |
| केस नोंदणी दिनांक | २९/११/२०२२ |
| केस निकाल दिनांक | ३०/०३/२०२६ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | ०३ ०४ ०१ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए. एस. वाडकर)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२४५/२०२२**
**निशाणी क्र.२६/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>गुन्हा नोंद क्रमांक : ३४२/२०२२, दिनांक १४/११/२०२२<br>पोलीस स्टेशन : कर्जत पोलीस स्टेशन,<br>ता. कर्जत, जि. रायगड | |
| फिर्यादी | सौ. राबीया मोहमद तालीब नवरंगे<br>राहणार : साई व्हीला रुम नं.१०३, सम्राटनगर , नेरळ<br>मूळ राहणार– गॅलेक्सी अपार्टमेंट रूम नं.३०१,<br>राजेंद्रगुरुनगर, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड |
| महाराष्ट्र शासनतर्फे | श्री. प्रदिप शिरसाट, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. मोहमंद तालीब अब्दुलमजिद नवरंगे**<br>वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी,<br><br>**२. कमरुनिसा अब्दुलमजिद नवरंगे**<br>वय : ५५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,<br><br>**३. अब्दुलमजिद युसुफ नवरंगे**<br>वय : ५७ वर्षे, व्यवसाय : मोलमजूरी,<br>आरोपी क्रं.१ ते ३ रा.गॅलेक्सी<br>अपार्टमेंट, राजेंद्रगुरुनगर, नेरळ, ता.कर्जत,<br>सध्या रा. मुंब्रा, जि. ठाणे |

| | |
|---|---|
| | **४. सबा सलमान नवरंगे**<br>वय : २४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,<br>राहणार : ओल्ड नशीमन, कॉलनी समना मंजील, ए विंग, ४०२ , मुंब्रा |
| आरोपीतर्फे वकील | श्री. प्रवीण कराळे. |

**(भाग "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८/०९/२०१८ |
| गुन्हा नोंदणी तारीख | १४/११/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २९/११/२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | १२/०८/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १६/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | ३०/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | निरंक |

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | किती शिक्षा दिली | खटला सुरु असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहमंद तालीब अब्दुलमजिद नवरंगे | दोषारोपपत्रा सह हजर | १२/१२/२०२२ | भारतीय दंड विधान संहिता कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २ | कमरुनिसा अब्दुलमजिद नवरंगे | दोषारोपपत्रा सह हजर | १२/१२/२०२२ | भारतीय दंड विधान संहिता कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३ | अब्दुलमजिद युसुफ नवरंगे | दोषारोपपत्रा सह हजर | १२/१२/२०२२ | भारतीय दंड विधान संहिता कलम | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ४९८(अ) | | | |
| ४ | सबा सलमान नवरंगे | दोषारोपपत्रा सह हजर | १२/१२/२०२२ | भारतीय दंड विधान संहिता कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## (भाग "क")

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील :-**

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | नाबिया मोहम्मद तालिब नवरंगे | २१ |
| २ | सीमा फईम मुल्ला | २५ |

**आरोपी पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील :-**

**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | फिर्याद व छापील फिर्याद | २२ व २३ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील** :–

| अ.क्रं. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक ३०/०३/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, कलम ४९८(अ) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

०२. दिनांक ०८/०९/२०१८ रोजी फिर्यादी यांचे आरोपी क्रं.1 सोबत लग्न झाले होते. दिनांक ०८/०९/२०१८ पासून ते दिनांक १४/११/२०२२ रोजी दरम्यान मौजे,साई व्हीला रुम नं. १०३, सम्राटनगर ,नेरळ , गॅलेक्सी अपार्टमेंट रुम नं.३०१ राजेंद्रनगर, ता. कर्जत येथे फिर्यादी यांचे लग्न झाल्यापासून आरोपी क्रं.२ व ३ म्हणजे त्यांचे सासु–सासरे व आरोपी क्रं.१ हे वारंवार हाताबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ करत होते.तसेच आरोपी क्रं.४ यांनी देखील फिर्यादी यांचे घरी येवून तुझा व तुझ्या मुलांचा खर्च आम्हाला परवडत नाही तू तुझ्या माहेरी निघून जा असे फिर्यादी यांना सतत शारिरीक, मानसिक छळ करुन, क्रुर वागणूक दिली म्हणून आरोपीविरुध्द सदरची फिर्याद कर्जत पोलीस स्टेशन येथे दाखल

केली.

०३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र.३४२/२०२२ भारतीय दंड संहितेचे कलम ४९८(अ) अन्वये गुन्हा नोंदविला गेला. तपासी अंमलदाराने तपासामध्ये फिर्यादीचा जबाब नोंदविला, घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, घटनास्थळाचा नकाशा हस्तगत केला, साक्षीदारांची टिपणे नोंदविली, मा. संचालक, वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना यांचेकडून तपासणी अहवाल हस्तगत केला, फिर्यादीच्या वैद्यकीय तपासणीचा मेडिकल पेपर हस्तगत केला व तपास पुर्ण होताच आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने वरील कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. मी आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ४९८(अ) अन्वये निशाणी क्र.१३ प्रमाणे दोषारोप नोंदविला. आरोपीस गुन्हयाचे विवरण त्याचे मातृभाषेत वाचुन व समजावून सांगितले असता आरोपीने आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. संपरीक्षेदरम्यान आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुराव्याची नोंद झालेली नसल्याकारणाने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात येणारा जबाब वगळण्यात आलेला आहे.

०५. फिर्यादी पक्षाचा पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक ०८/०९/२०१८ पासून ते दिनांक | |

| | | |
|---|---|---|
| | १४/११/२०२२ रोजी दरम्यान मौजे,साई व्हीला रुम नं. १०३, सम्राटनगर ,नेरळ , गॅलेक्सी अपार्टमेंट रुम नं.३०१ राजेंद्रनगर, ता. कर्जत येथे आरोपींनी समान हेतु साध्य करण्याच्या उद्दिष्टाने आरोपी क्र.१ ते ४ यांनी फिर्यादी यांचे लग्न झाल्यापासून आरोपी क्रं.२ व ३ म्हणजे त्यांचे सासु–सासरे व आरोपी क्रं.१ हे वारंवार हाताबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ करत होते, तसेच आरोपी क्रं.४ यांनी देखील फिर्यादी यांचे घरी येवून तुझा व तुझ्या मुलांचा खर्च आम्हाला परवडत नाही तू तुझ्या माहेरी निघून जा असे फिर्यादी यांना सतत बोलून तिचा शारिरीक, मानसिक छळ करुन, क्रुर वागणूक दिली ? | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत** –

०६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी नाबिया मोहम्म्द तालिब नवरंगे (साक्षीदार क्र.१ – निशाणी क्र.२१) यांची साक्ष नोंदविण्यात आली. दिनांक ०८/०९/२०१८ रोजी त्यांचा आरोपी क्र.१ सोबत विवाह झाला होता, लग्नानंतर त्या, त्यांचे पती, सासु–सासरे व दिर यांच्यासोबत राहत होत्या, लग्न झाल्यानंतर त्यांच्यामध्ये घरगुती भांडणे होत होती, त्यांनी आरोपींविरुध्द गैरसमजुतीतुन फिर्याद दाखल केली होती, त्यांना अभिलेखावरील फिर्याद व छापील फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर त्यांची सही आहे, त्यातील मजकुर त्यांना माहीत नाही, त्यांना त्यांच्या फिर्यादीतील अधोरेखांकित मजकुर “अ” वाचुन दाखविण्यात आला, सदरचा मजकुर त्यांनी फिर्याद देताना सांगितला नव्हता, सदरचा मजकुर

पोलीसांनी त्यांच्या फिर्यादीमध्ये का नमुद केला याचे कारण त्यांना सांगता येणार नाही, लग्नानंतर त्यांचे सासु–सासरे, पती व चुलत नणंद असे शिवीगाळ करुन त्यांना मारहाण करीत होते, ते त्यांना माहेरी जाण्यास सांगत होते, सदर घटना घडल्यामुळे त्यांनी फिर्याद दिली होती, त्यांची आरोपींसोबत तडजोड झालेली आहे, त्या त्यांच्या पतीसोबत एकत्र नांदत आहेत. आरोपीतर्फे वकिलांनी साक्षीदाराचा उलटतपास नाकारला आहे.

०७. अभियोग पक्षातर्फे सीमा फईम मुल्ला (साक्षीदार क्र.२ – निशाणी क्र.२५) यांची साक्ष नोंदविण्यात आली.फिर्यादी ही त्यांची मुलगी आहे, तिचा आरोपी क्र.१ सोबत विवाह झाला होता, त्यांचा विवाह ८ वर्षांपुर्वी झाला होता, त्यावेळेस त्यांच्यामध्ये घरगुती भांडणे झाली होती, त्यांना त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित मजकुर “अ” वाचुन दाखविण्यात आला, सदरचा मजकुर त्यांनी जबाब देताना सांगितला नव्हता, सदरचा मजकुर पोलीसांनी त्यांच्या जबाबामध्ये का नमुद केला याचे कारण त्यांना सांगता येणार नाही, लग्नानंतर त्यांच्या मुलीला तिचे सासु–सासरे, पती व चुलत नणंद असे शिवीगाळ करुन तिला मारहाण करीत होते, ते तिला माहेरी जाण्यास सांगत होते, सदर घटना घडल्यामुळे त्यांच्या मुलीने फिर्याद दिली होती. त्यांच्या मुलीची आरोपींसोबत तडजोड झालेली आहे व त्यांच्यातील सर्व वादविवाद मिटलेले आहेत व ती तिच्या पतीसोबत एकत्र नांदत आहे. आरोपीतर्फे वकिलांनी साक्षीदाराचा उलटतपास नाकारला आहे.

०८. फिर्यादी अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे त्यांना सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु त्यामध्ये देखील त्यांनी अभियोग पक्षास मदत करणारा कोणताही पुरावा दिलेला नाही. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, त्यांची आरोपीसोबत तडजोड

झालेली आहे. आरोपीतर्फे वकिलांनी फिर्यादीचा उलटतपास नाकारला आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष लक्षात घेता खटल्याची पुढील कारवाई निरर्थक ठरेल या हेतुने व निशाणी क्र.२४ वरील फिर्यादीच्या तडजोड पुरशिस अन्वये अभियोग पक्षाची पुराव्याची बाजु बंद करण्यात आली.

०९. वरील साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीकडून कोणतीही कृती घडल्याबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे.

१०. वर नमुद पुराव्याचे अवलोकन केले असता दिनांक ०८/०९/२०१८ पासून ते दिनांक १४/११/२०२२ रोजीच्या दरम्यान मौजे,नेरळ , गॅलेक्सी अपार्टमेंट रुम नं.३०१ राजेंद्रनगर, साई व्हीला रुम नं. १०३, सम्राटनगर ,ता. कर्जत येथे आरोपींनी सतत शारिरीक, मानसिक छळ करुन, क्रुर वागणूक दिली याबाबत कुठलाही ठोस पुरावा आलेला नाही. सबब मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u>** –

११. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्ष हा आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यास पूर्णतः अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षान्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्रं. १ ते ४ यांना भारतीय दंड संहितेचे कलम ४९८(अ) गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींची जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | सदर खटल्यामध्ये कोणताही मुद्देमाल जप्त नसल्यामुळे त्याबाबत आदेश नाही. |
| ४. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणेकरिता आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र देण्यात यावे. |
| ५. | प्रकरण बंद करण्यात येते.<br>(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

Sd/-

दिनांक – ३०/०३/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड